# गांडूळ खत


धनश्री गवस
आचार्य पदवी विद्यार्थिनी
डॉ. बा. सा. कों. कृ. वि., दापोली

तेजस कणसे
आचार्य पदवी विद्यार्थी
अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग
इं. गां. कृ. वि., रायपूर

श्रीराम गोडसे
आचार्य पदवी विद्यार्थी
म. फु. कृ. वि., राहुरी


'शेतकऱ्यांचा मित्र' म्हणून ओळखणारा गांडूळ हा ओलसर मातीत राहणारा, वलयांकीत, लांब शरीर असणारा, सरपटणारा प्राणी आहे. गांडूळ जैविक पदार्थांचे सुपिक मातीत रूपांतर करतो तसेच जमीन भुसभुशीत करतो. त्यामुळे मातीत ऑक्सिजन खेळता राहतो.



## गांडूळ खत निर्मिती:

### जागेची निवड

- गांडूळ खतासाठी जमीन पाण्याचा निचरा होणारी असावी.
- खड्याच्या जवळपास मोठी झाडे असू नयेत, कारण झाडाची मुळे गांडूळखतामधील पोषक घटक शोषून घेतात.
- गांडूळ खत सावली मध्ये तयार करावे.

### गांडूळ खाद्य

- चराच्या तळाशी ८ ते ९ से. मी. उंचीचा किंवा जाडीचा थर काडीकचरा, पालापाचोळा, वाळलेले गवत यांनी भरावा. त्यावर पाणी मारावे.
- या थरावर ८ ते ९ से. मी. जाडीचा दुसरा थर कुजलेले शेणखत, लेंडीखत, सेंद्रीयखत यांचा द्यावा. त्यावर ओले होईपर्यंत पाणी शिंपडावे, त्यानंतर या थरावर गांडूळे सोडावीत. यावर ५ ते ६ से. मी. जाडीचा थर कुजलेले सेंद्रीयखत, शेणखत यांचा थर द्यावा.
- या थरावर २० ते ३० से.मी. उंचीपर्यंत शेणखत, लेंडीखत, सेंद्रीयखत टाकावे. यावर ओले होईपर्यंत पाणी शिंपडावे. मग गोणपाटाने झाकून घ्यावे.
- दररोज यावर पाणी शिंपडावे म्हणजे ओलसर पणा टिकून राहील आणि गांडूळाची चांगली वाढ होऊन गांडूळखत तयार होईल.
- या पद्धतीने १५ ते २० दिवसात खत तयार होते. त्याच प्रमाणे घरातील कचरा, सांडपाणी, तसेच स्वयंपाक घरातील कचरा सुद्धा वापरता येतो.
- शेणखतामध्ये गांडूळाची वाढ उत्तम होते. त्यांची संख्या जोमाने वाढून गांडूळखत उत्तम प्रतीचे तयार होते.
- खतासाठी लागणारे खाद्य कमीतकमी अर्धवट कुजलेले असावे. शेणखत आणि सेंद्रीयखत यांचे मिश्रण अर्धे - अर्धे वापरून वापरून खत तयार करता येते.
- गांडूळामध्ये शेतातील ओला पाला पाचोळा, भाजीपाल्याचे अवशेष, अर्धवट कुजलेले पिकांचे अवशेष यांचा वापर होऊ शकतो. मात्र हे खाद्य गांडुळासाठी वापरताना काही प्रमाणात शेणखत मिसळणे आवश्यक आहे.

## गांडूळ खताचे फायदे:

- जमिनीचा पोत सुधारतो.
- जमिनीत पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढते.
- जमिनीची धूप कमी होते.
- बाष्पीभवनाचे प्रमाण कमी होते.
- जमिनीचा सामू योग्य पातळीत राखला जातो.
- गांडूळखतामध्ये ह्युमस चे प्रमाण भरपूर असल्यामुळे नत्र, स्फुरद, पालाश व इतर सूक्ष्मद्रव्य झाडांना भरपूर व लगेच उपलब्ध होतात. जमिनीतील उपयुक्त जिवाणूंच्या संख्येत भरमसाठ वाढ होते.
- मातीचा कस टिकून राहतो.
- गांडूळे जमिनीवर खोलवर जाऊन मशागत करत असल्यामुळे जमिनीची उलथापालथ करतात. त्यामुळे शेतातील माती उपजाऊ बनते.
- जमिनीत राहिलेले पिकांचे अवशेष इतर सेंद्रिय पदार्थ यांचे गांडूळांच्या मदतीने जलद विघटन होऊन त्यातील अन्नद्रवे मुक्त होतात. जमिनीची सुपीकता वाढविण्यास मदत होते.
- माती, खाद्य पदार्थ आणि जमिनीतील पाण्याच्या माध्यमाद्वारे होणारे प्रदुषण कमी होते.
- रोगराईचे प्रमाण कमी होऊन आरोग्य चांगले राहते.

## संवर्धनासाठी घ्यायची काळजी:

- उंदीर, बेडूक, मुंग्या, घूस यांपासून गांडुळांचे संरक्षण करावे.
- गादीवाफ्यावर सरळ सूर्यप्रकाश येणार नाही याची काळजी घ्यावी.
- गादीवाफ्यावर पाणी मारताना जास्त पाणी निचरा होणार नाही याची काळजी घ्यावी.
- गांडूळे हाताळताना त्यांना इजा होणार नाही याची दक्षता घ्यावी.

(संपर्क: +९१ ९६८९२७२००४)

★ ★ ★